93

कार्यकारी अभियंता कार्यालय
चतुश्रृंगी पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र. ९९४८
दि. २६/८/२०२४

प्रती,
**मे.सॅफरॉन डेव्हलपर्स, तर्फे श्री.यशवंत निम्हण**
**ऋषिकेश निम्हण,अभिषेक निम्हण व सुदिन खोत**
**स.नं.२८/३/१ सुस,पुणे**

विषय :- पुणे मनपामधील नव्याने समाविष्ट गावांमधील पाणीपुरवठ्या बाबत
( गावाचे नाव – सुस )

संदर्भ :-१) आपले मा. कार्यकारी अभियंता, चतुर्श्रुंगी पाणी पुरवठा विभाग यांना पत्र आ. क्र.१३०५ दि. ८/८/२०२४
२) मा.मुख्य अभियंता ठराव क्र. १/२८२ दि. २२/८/२०२४

संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

पुणे मनपामध्ये दि.३०/०६/२०२१ रोजी नवीन 23 गावे समाविष्ठ करण्यात आलेली आहेत. त्यापैकी सुस व म्हाळुंगे गावाचा DPR तयार करण्यात आला आहे. DPR नुसार जागेवर काम सुरु करण्यात आलेले आहे. समाविष्ठ गावांसाठी नव्याने वितरण व्यवस्था विकसित करणे ,पाण्याच्या टाक्या बांधणे, नव्याने पाण्याच्या बांधण्यात येणाऱ्या टाक्या भरण्यासाठी ट्रान्समिशन लाईन्स टाकणे इ. कामाचा समावेश आहे. मान्य DPR नुसार नियोजित कामे पूर्ण झाल्यानंतर व आपल्या प्रकल्पापर्यंत पाणीपुरवठा करणे शक्य आहे. तसेच प्रस्तावित प्रकल्पामध्ये टॉयलेट flushing इ. वापरासाठी STP चे पाणी पुनर्वापर करणार,प्रत्येक सदनिकेस एक स्वतंत्र पाण्याचे इनलेट बसवून पाणी मीटर बसविणार.तसेच भावी काळामध्ये सोसायटी/अपार्टमेंट अंतर्गत पाणी वापराचे बिलिंग करणे साठी आवश्यक संगणकीय प्रणाली तयार करून देणार या अटींवर त्यावेळच्या परिस्थितीनुसार व धोरणानुसार प्रकल्पास पाणीपुरवठा / कनेक्शन बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

तथापि तूर्त पुणे मनपास पाटबंधारे विभागाकडून मंजूर पाणी कोटा, प्रत्यक्षात घेण्यात येणारे पाणी, समाविष्ट गावातील अस्तित्वात असलेली बांधकामे, लोकसंख्या वाढ इ. विचारात घेता सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देखील आपल्या प्रकल्पास किती प्रमाणात पाणीपुरवठा करता येईल ? याबाबत सद्यस्थितीत खात्री देता येत नाही.

सदर माहिती आपल्या पत्राच्या अनुषंगाने कळवीत आहोत.

(सही) 26-8-24
( सौरभ संकटे )
कनिष्ठ अभियंता
चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

(सही) 26/8
( प्रदीप रंगदळे )
उप अभियंता
चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

(सही) 26/8
(प्रसाद भांगे)
कार्यकारी अभियंता
चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका